# राष्ट्रीय लोक अदालत
# दिवाणी व फौजदारी न्यायालय –करमाळा

(विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ (केंद्रीय कायदा) चे कलम १९ नुसार आयोजीत)

निशाणी क्र. ६० ... ... .

प्रकरण क्रमांकः – नियमित दिवाणी दावा क्र.३९१/२०२३

अर्जदार/ फिर्यादी/वादीचे नाव श्री शंकर जाधव वगैरे

गैरअर्जदार/आरोपी/प्रतिवादीचे नाव – श्री.बजरंग सिदनकर

न्यायालयाचे नावः – दिवाणी न्यायालय व.स्तर, करमाळा

(१) न्यायीक अधिकारी यांचे नांव – श्री. एस.एम.घुगे
(२) पॅनल सदस्यः – श्री. जे.बी. चव्हाण

## अवार्ड

दोन्ही पक्षांमधील वाद सामंजस्याने मिटवण्यासाठी प्रस्तुतचे प्रकरण हे आज रोजी राष्ट्रीय लोक अदालत समोर सादर करण्यात आले आहे. उभय पक्षकारांनी या लोक अदालतसमक्ष तडजोड केली आहे आणि त्यांच्या तडजोडीच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेतः

१) दावा मिळकतीच्या मालकी हक्काबाबत वादी–प्र.वादीना काहीएक आक्षेप नाही. तसेच प्र.वादीची मौजे गुळसडी येथील जमीन गट नं.१८१/१ ही मिळकत मुळ गट नं.१८१ चाच भाग होती. त्यामुळे प्र.वादीस गट नं.१८१ मधुन म्हणजेच गट नं.१८१/२/अ व गट नं.१८१/२/ब च्या पश्चिम बांधाचे बाजुने जाणेचा अधिकार असल्याने उभयतांना मान्य असलेने वादी प्रतिवादीनी सदर तडजोड केलेली आहे.

२) प्रतिवादीचे मौजे गुळसडी येथील जमीन गट नं. १८१/१ व गट नं. १८२/१/अ या मिळकतीमध्ये जाणे–येणेकरीता तहसीलदार सो. करमाळा यांचेकडे अर्ज क्र.२/१४३/एसआर/७/२०२१ दाखल केला होता. सदर अर्जामध्ये तहसीलदार सो. करमाळा यांनी प्रस्तुत दाव्यामधील सिदनकर यांचे जमीनीत जाणे–येणेकरीता जमीन गट नं.१८१/२/अ व गट नं. १८१/२/व या गटांचे पश्चिम बाजुने व जमीन गट नं. १८२/१/ब/४ म्हणजेच दावा कलम १

Scanned with OKEN Scanner

(क) चे पूर्व बांधावरुन १२ फुट रुंदीचा दहिगांव उपसा सिंचन कॅनॉलचे साईटपट्टीपासून उत्तरेकडे जाणारा १२ फूट रुंदीचा गट नं. १८२/१/अ ने दक्षिण बांधापर्यंतचा असा दक्षिण-उत्तर चालीचा रस्ता मंजूर केलेला होता व आहे. सदरचा तहसीलदार सो करमाळा यांनी क्र.जमा/२/१४३/एसआर/७/२०२१ मध्ये दि.१३/०५/२०२२ रोजी मंजूर केलेल्या रस्त्या व्यतिरीक्त दूसरा कोणताही पर्यायी रस्ता प्रतिवादीना त्यांचे मिळकतीत जाणे-येणेकरीता उपलब्ध नाही हे उभयतांना विशेषतः वादींना मान्य व कबुल आहे.

३) वादी प्रतिवादी दरम्यान सदर तडजोडीन्वये असे ठरलेले आहे की, प्रतिवादीना त्यांचे जमीन गट नं.१८१/१ व १८२/१/अ मध्ये जाणे-येणेकरीता त्यांना स्वतः किंवा त्यांचे मजूर वहीवाटदार यांना शेतजमीनी मेहनत, मशागत करणेकरीता ट्रॅक्टरची जे.सी.बी वा मळणीयंत्र किंवा अन्य वाहनांची ने-आण करणेकरीता दहिगांव उपसा सिंचन कॅनॉलचे उत्तरेकडील साईडपट्टीने आलेनंतर उत्तरेककडे ओळून दावा कलम १ (अ) व १ (ब) चे पश्चिम बांध तर दावा कलम १ (क) चा पूर्व बांध या बांधावरुन १२ फूट रुंदीचा गट नं. १८२/१/अ चे दक्षिण बांधापर्यंतचा जो रस्ता म्हणजेच तहसीलदार सो. करमाळा यांनी रस्ता केस क्र. जमा २/१४३/एसआर/७/२०२१ मध्ये मंजूर केलेल्या रस्त्यावरुन प्रतिवादी अथवा त्यांचे वहीवाटदारांनी कायमस्वरुपी वहीवाट करणेची आहे. सदरच्या रस्त्याची पुर्व-पश्चिम रुंदी अंदाजे १२ फुट तर दक्षिण-उत्तर लांनी अंदाजे २२५ फुटापर्यंत आहे. या उपरोक्त रस्त्यावरुन प्रतिवादी अथवा त्यांचे वहीवाटदारांना जाणे-येणेस कोणत्याही कसल्याही प्रकारे वादी अथवा त्यांचे वारसदार यांनी अडथळा निर्माण करणेचा नाही हे उभयतांना विशेषतः वादींना मान्य व कबुल आहे.

४) वर तडजोड पुरसीसमध्ये वादी प्रतिवादीना मान्य असलेला रस्ता १२ फुट रुंदीचा असुन तो रस्ता गट नं. १८२/१/अ या जमीनीच्या दक्षिण-पूर्व कोप-यात जिथे मिळतो त्या ठिकाणी गट नं. १८१/२/ब या मिळकतीचे पश्चिम बाजुचे बांधाने गट नं. १८२/१/अ व गट नं. १८१/२/ब चे बांधापासुन उत्तरकडे गट नं.१८१/२१ मधील ६ फूट रुंदीचे व ६ फुट लांबीचे क्षेत्र नं.१८२/१/अ मध्ये चढ-उतार। ये-जा करणेकरीता ठेवलेले आहे. हे उभयतांना विशेषतः वादीना मान्य व कबुल आहे. तहसिलदार सो.करमाळा यांनी क्र.२/१४३/एसआर/७/२०२१ मध्ये दिनांक १३.०५.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशामधील मजकूर आहे तसाच ठेवलेला आहे. परंतु गाडी रस्ता या शब्दाऐवजी उभयतांनी १२ फुट रुंदीचा रस्ता ठेवलेला आहे.

Scanned with OKEN Scanner

यातील वादीनी बार्शी येथील जिल्हा न्यायालयात दि.कि.अपील नं.१०६/ २०२२ यातील प्रतिवादी विरुध्द दाखल केलेले आहे. सदरचे अपील वादीनी बिनशर्त काढून घेणेचे आहे. तसेच वादी व प्र.वादी दरम्यान आपापसात तडजोड झालेली आहे. वादीनी दाव्यामध्ये दावा कलम १ (अ) १ (ब) चा पश्चिम व दावा कलम १ (क) ने पुर्व बांधावरील तहसीलदार सो. करमाळा यांनी मंजूर केलेल्या रस्ता प्रस्तुत दाव्यात आव्हानीत केलेला होता. सबब वादीनी या दाव्यातील जाहीर ठरावाची व निरंतर ताकीदीची दाद बाबतची मागणी वादीनी कायमची सोडुन दिलेली आहे.

५) वर तडजोड पुरसीस कलम २ व ३ मध्ये नमुद केलेला म्हणजेच तहसीलदार सो. करमाळा यांनी मंजूर केलेला रस्ता प्र.वादी मालकी हक्काने वापरणार आहेत. त्या वादी-प्र.वादीना मान्य असलेल्या रस्त्याकरीता वादीचे मिळकतीतील जेवढे क्षेत्र जात आहे म्हणजेच कॅनॉलपट्टीपासुन उत्तरेकडे गट नं.१८२/१/अ चे दक्षिण बांधापर्यंत १२ फुट रुंदीचे क्षेत्राच्या मोबदल्यापोटी प्रःवादीने वादीना रक्कम रु.३,५०,०००/- (अक्षरी तीन लाख पन्नास हजार रु.) दिलेले आहेत. त्या रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे,

अ) उपरोक्त रक्कमेपैकी रक्कम रु.१,६२,५००/- वादी नं.१ ते ३ करीता वादी नं.१ चे नावे प्र. वादीचे बँक ऑफ बड़ौदा शाखा भोसरी या खात्यावरील रक्कम रु.१,६२,५००/- चा धनादेश क्र.००००२४ दि.१४/०३/२०२६ रोजीचा धनादेश दिलेला आहे.

ब) रक्कम रु.१,६२,५००/- वादी नं.४ करीता वादी नं.४ चे नावे प्रतिवादीचे बँक ऑफ बडौदा शाखा भोसरी या खात्यावरील धनादेश नं.००००२५ दि.१४/०३/२०२६ रोजीचा धनादेश वादी नं.४ यास दिलेला आहे.तर उर्वरीत रक्कम रुपये १२,५००/- वादी क्र.१ यास रोख स्वरुपात दिले. तर रक्कम रुपये १२,५००/- प्रतिवादीने वादी क्र.४ यास रोख स्वरुपात दिले आहेत.

६) वादी नं.३ हा नौकरीस असलेकारणाने तो वेळोवेळी न्यायालयात येऊ शकत नसलेने वादी नं.३ ने वादी नं.१ ये हक्कात नौदणीकृत कुलमुखत्यारपत्र लिहुन नोंदवून दिलेले आहे. सदरचे कुलमुखत्यारपत्र दि.२३/०२/२०२६ रोजी नोदणीकृत दस्त नं.९१५/२०२६ अन्वये मे. दुय्यम निबंधक सो. करमाळा यांचे कार्यालयात नोंदविलेले आहे. त्यामुळे प्र.वादीने वांदी नं.१ चे नावे दिलेला उपरोक्त धनादेशावरील रक्कम ही वादी नं.१ ते ३ करीता एकमात्र दिलेली आहे. हे उभयतांना मान्य व कबूल आहे.

Scanned with OKEN Scanner

७) वर तडजोड पुरसीस कलम २ व ३ मध्ये नमुद केलेला रेखांकृत रस्ता तयार करताना जी माती निघेल ती माती प्रतिवादीने बाजुस ठेवणेची आहे व त्या रस्त्यावर प्रतिवादीने मुरुमीकरण करुन घेणेचे आहे. उपरोक्त रस्त्याकरीताचे क्षेत्र आजरोजी वादींनी प्रतिवादीचे प्रत्यक्ष ताब्यात दिलेले आहे. त्याकरीता वादींनी प्र.वादीस कोणत्याही कसल्याही प्रकारचा विरोध करणेचा नाही. हे उभयतांना विशेषतः वादीना मान्य व कबुल आहे.

८) सदर रस्त्याची वर कलम ७ मध्ये नमुद केलेली डागडुजी किंवा मुरमीकरण प्र.वादीने संपुर्ण स्वतः स्वखर्चाने करणेची आहे. त्याकरीता वादी कोणत्याही आर्थीक झळ सोसणार नाहीत. हे उभयतांना विशेषतः प्रतिवादीना मान्य व कबुल आहे.

९) वर कलम ७ मध्ये नमुद केलेल्या रस्त्यावरील खोलीकरणं किंवा मुरमीकरण करत असताना जर वादी नं.१ ते ३ यांची पाईपलाईन आडवी आली तर प्रतिवादीने स्वखचनि तेवढ्या क्षेत्रावरील पाईपलाईन वादीना रस्त्याच्या पुर्वेकडील बाजुने करुन देणेची आहे. हे उभयतांना विशेषतः प्र. वादीना मान्य व कबुल आहे.

१०) तहसीलदार सो. करमाळा यांणी क्र.जमा। २/१४३/एसआर/७/२०२१ मध्ये दि.१३/०५/२०२२ रोजी मंजूर केलेला प्रतिवादीचा रस्ता म्हणजेच वर तडजोड पुरसीस कलम २ व ३ मध्ये नमुद व अधोरेखीत केलेला रस्ता हा तडजोड पुरसीस सोबत दाखल केलेल्या कच्च्या नकाशामध्ये पिवळ्या रंगाने दर्शविलेला आहे. सदरचा रस्त्याचे निश्चित स्थान लक्षात येणेकरीता तो कच्च्या नकाशात दर्शविलेला आहे. सदरचा कच्चा नकाशात नमुद केलेला रस्ता हा वस्तुस्थितीप्रमाणे खरा व बरोबर असुन तो कच्चा नकाशा प्रस्तुत तडजोड पुरसीसचा भाग समजणेत यावा.

पक्षकारांना सुचीत करण्यात येते की, त्यांनी कोर्ट फी (भरली असल्यास) कायद्याप्रमाणे व नियमाप्रमाणे त्यांना परत करण्यात येईल.

**अर्जदार/ फिर्यादी/वादी** **गैरअर्जदार/आरोपी/प्रतिवादी**

१. शंकर मारुती जाधव शंकर मारुती जाधव बजरंग तात्या सिदनकर

डा.नि.अंगठा शंकर मारुती जाधव यांचा असे

डा.नि.अंगठा बजरंग तात्या सिदनकर यांचा असे

२. जीजाबाई शंकर जाधव

३. सुरज बापु कारंडे

४. संतोष भास्कर कोलते

सही –... ... ... ... ... ... ... ...

**अर्जदार/ फिर्यादी/वादीचे वकील**

सही –... ... ... ... ... ... ... ...

**गैरअर्जदार/आरोपी/प्रतिवादी चे वकील**

न्यायिक अधिकारी (पॅनल प्रमुख)

**विधिज्ञ (पॅनल सदस्य)**

**चेअरमन**

**तालुका विधी व सेवा समिती करमाळा**

विधी सेवा समिती/प्राधिकरण शिक्का

स्थळः करमाळा

दिनांकः १४.०३.२०२६

Scanned with OKEN Scanner